# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.२३/२०२२

| | | |
|---|---|---|
| श्री.तबरेज फैय्याज मुजावर<br>रा. १२१, रविवार पेठ, नेहरू चौकजवळ कराड,<br>जि.सातारा | } | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | | |
|---|---|---|
| १. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड,<br>जि. सातारा.<br>२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर<br>कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,कराड, जि.सातारा. | } | वि.प. |

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि. इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री. तबरेज फैय्याज मुजावर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.११/०८/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी सदर महाविद्यालयात दि.०१/०७/२०१४ पासून सहा. प्राध्यापक पदावर सलगपणे सेवा देत आहे. मात्र पगारातून ठराविक रक्कम देणे बंद केलेने व विभाग प्रमूख, उपप्राचार्य व प्राचार्य यांचे प्रचंड दबावानंतरही स्वतःच्या सहीने कोरे धनादेश जमा न केलेने मला दि.२९/१२/२०२१ रोजी बेकादेशीररित्या निलंबित केले आहे. त्यानंतर मला निलंबन भत्ता विद्यापीठ परिनियमातील तरतूदीपेक्षा फारच कमी दिला आहे. जून २०२२ व जुलै २०२२ चा निलंबन भत्ता अद्यापही अदा केलेला नाही. तसेच दि.१९/०७/२०२१ रोजी रजेचा अर्ज देवूनही बिनापगारी रजा करणेत आली. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना जुलै २०२१ चा पगारामध्ये जो २२/०९/२०२१ रोजी अदा झाला त्यात मला वगळता सर्वांना पगारवाढ देण्यात आली आहे. मला निलंबन भत्ता विद्यापीठ परिनियमातील तरतूदी अनुसार अदा करणे, रजा पगारी करणे व जुलै २०२१ पासून पगारवाढ देणेचे आदेश संबधित व्यवस्थापनास व्हावेत ही विनंती.

**संस्था/महाविद्यालयाचा अभिप्राय :**

वरील तक्रार संबधी माहिती ही दि.२० जुलै व ३ ऑगस्ट २०२२ रोजीच्या मेल नुसार मिळाली. सर्व तक्रारी ह्या दिशाभुल करणा-या आहेत. निलंबन हे विद्यापीठाच्या नियमानुसार झालेले आहे. निलंबन भत्ता हा सुध्दा नियमानुसार दिलेला आहे. Performance appraisal form भरून न दिल्याने वेतनवाढ दिलेली नाही. सदर तक्रार ही सुडबुध्दीने महाविद्यालयाला बदनाम करण्यासाठी केलेली आहे. सदर तक्रारीमध्ये काहीही तथ्य नाही.

**समितीची निरिक्षणे :**

सदर तक्रार सुनावणीकरिता घेतली असता, आज रोजी, तक्रारदारातर्फे तक्रारदार स्वतः हजर होते व महाविद्यालयतर्फे प्राचार्य डॉ.ए.एम.मुल्ला व संस्थेतर्फे सचिव डॉ.माधुरी गुजर हजर होत्या. संस्थेतर्फे तक्रारदारांना दि.२९/१२/२०२१ रोजी निलंबीत करण्यात आले होते व त्यास निलंबन काळात वेतनाच्या पन्नास टक्के निलंबन भत्ता देण्यात आला होता. ही बाब मान्य करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांना दि.२९/१२/२०२१ रोजी निलंबिन केले असून दि.१५/०२/२०२३ रोजी त्यांची सेवासमाप्ती केली आहे असे म्हणणे मांडलेले आहे. संस्थेतर्फे त्या तारखेपर्यंत तक्रारदारांना पन्नास टक्के निलंबन भत्ता देण्यात आले असल्याचे निवेदन करण्यात आले आहे. ५० टक्के निलंबन भत्ता देण्याचे कारण संस्थेतर्फे असे देण्यात आलेले आहे की, तक्रारदारांनी नियमानुसार तीन महिन्याच्या कालावधीनंतर आपण इतर कोणतीही नेमणुक निलंबन काळात स्विकारणार नाही, असे वचन पत्र (Undertaking) लिहून दिलेले नसल्याने त्यांना शंभर टक्के निलंबन भत्ता दिलेला नाही. उत्तरादाखल, तक्रारदारातर्फे दि.१७/१२/२०२२ रोजीचे गैरअर्जदाराने दिलेले एक पत्र या समितीसमोर युक्तीवादा दरम्यान हजर करण्यात आलेले असून त्यामध्ये तक्रारदाराने खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

"मी आपल्या महाविद्यालयात स्थापत्य विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कायम सेवेत होतो. तुम्ही मला दिनांक २९/१२/२०२१ रोजी सेवेतून निलंबित केले आहे व माझी चौकशी सुरू केली आहे. चौकशीकामी मी प्रत्येक तारखेस हजर आहे. या काळात मी कोणताही व्यवसाय, नोकरी केलेली नाही याची नोंद घ्यावी.

शिवाजी विद्यापीठ परिनियम २१६ प्रमाणे निलंबनाच्या तीन महिन्याच्या कालावधीनंतर मला माझ्या पूर्ण पगारा एवढा निलंबन भत्ता मिळणे आवश्यक होते. मात्र, तुम्ही मला अत्यंत नाममात्र निलंबन भत्ता दिलेला आहे, ही बाब अयोग्य आणि अन्यायी आहे.

सबब, तुम्हास विनंती की परिनियमातील तरतुदीप्रमाणे मला माझ्या पूर्ण पगारा एवढा निलंबन भत्ता मागील थकबाकीसह माझ्या बँक खात्यात सत्वर जमा करावे."

शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ कलम ४२ (१) अंतर्गत प्रस्तापीत महाविद्यालयीन शिक्षकांकरिता लागु असणारे परिनियमामधील २१६ (B) मध्ये शिक्षकांच्या निलबंनासंबधी तरतुदी केलेल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणाशी संबधीत असणारी तरतुद (B) ii) आणि Explanation मध्ये आहे.

B) Suspension ;

ii) During the period of suspension, a teacher shall be paid a subsistence allowance equal to his full pay & allowances admissible, pending regular enquiry.

a) The amount of subsistence allowance may be reduced by a suitable amount, not exceeding 50 per cent of the pay excluding the allowances admissible during the period of the first 3 months, if in the opinion of the said authority the period of suspension has been prolonged beyond 3 months due to reasons to be recorded in writing directly attributable to the teacher.

b) The rate of dearness allowance will, as the case may be, vary according to the decreased amount of pay admissible under sub-clause (a) above.

Explanation:

1) No payment under this rule shall be made to a teacher unless he furnishes an undertaking to the effect that he has not accepted any private employment or is not engaged in a trade or business during the period of his suspension.

या तरतुदीनुसार निलंबन काळामध्ये शिक्षकाला त्याचा पूर्ण पगार आणि भत्ता इतका निलंबन भत्ता चौकशी दरम्यान देण्यात यावा, अशी तरतुद असल्याचे दिसते. तथापि, sub-clause (a) प्रमाणे हा निलंबन भत्ता निलंबन काळाच्या पहिल्या तीन महिन्याच्या कालावधीत पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त असू नये, अशी तरतूद असल्याचे दिसते आणि तीन महिन्याच्या कालावधीनंतर संबंधीत अधिकारी यांच्या मतानुसार जर निलंबनाचा कालावधी तीन महिन्यांपेक्षा जास्त वाढत असेल तर हा निलंबन भत्याचा दर हा वाढू शकतो.

निलंबन भत्ता देण्यापुर्वी निलंबित शिक्षकाला निलंबनाच्या कालावधीमध्ये तो इतर कोणतीही नेमणुक स्विकारणार नाही किंवा स्विकारलेली नाही असे वचन पत्र (Undertaking) देणे बंधनकारक केले आहे. तक्रारदाराने दिलेले दि.१७/१२/२०२२ चे पत्र वचनपत्र ह्या सदराखाली पडत नाही असे ह्या समितीचे स्पष्ट मत आहे.

(B) ii) चा विचार करता असे दिसून येते की, ज्या वेळेला निलंबनाचा कालावधी तीन महिन्यांपेक्षा जास्त वाढविण्याची गरज असते त्यावेळेस निलंबन भत्ता हा पन्नास टक्क्यांपेक्षा वाढविण्याचा स्वेच्छाधिकार हा संबंधीत अधिकारी यांना दिलेला आहे. आणि त्या अधिकाराचे पालन करीत असताना

जर संबंधीत अधिकाऱ्याच्या निदर्शनास निलंबित शिक्षकाने जर वर नमुद वचनपत्र (Undertaking) दिलेले नसल्यास त्यास शंभर टक्के निलंबन भत्ता नाकारण्याचा अधिकार प्राप्त होतो, असे या समितीचे मत आहे. त्यानुसार जर तक्रारदारास शंभर टक्के निलंबन भत्ता देण्यात आलेला नसेल तर त्यात गैरअर्जदार यांची काही चूक नाही, असे या समितीचे मत आहे. त्यामुळे तक्रारदाराच्या तक्रारीमध्ये काहीही तथ्य नाही, असे या समितीचे मत आहे. आणि ही तक्रार नामंजूर करावी, असे या समितीचे निरीक्षण आहे.

सबब, ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक : 27 SEP 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)